Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 January 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १४ जानेवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

भारतीय हवामान विभागाच्या दिडशेव्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दिल्लीत भारत मंडपम इथं मिशन मौसमचं उद्घाटन करत आहेत. हवामानाबाबत माहिती देणारी अत्याधुनिक यंत्रणा निर्माण करण्याच्या उद्देशानं ही योजना तयार करण्यात आली आहे. अत्याधुनिक रडार यंत्रणा, उपग्रह यांच्या माध्यमातून हवामानाबाबतची अचूक निरीक्षणं याद्वारे मिळू शकतील. हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या उद्देशानं तयार करण्यात आलेल्या आयएमडी व्हिजन – २०४७ चं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते यावेळी होणार आहे. त्यात हवामानाचा अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामान बदल कमी करण्याच्या योजनांचा समावेश आहे.

****

सूर्याचा मकर राशीत प्रवेश तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण आज साजरा होत आहे. या दिवशी परस्परांना तीळगुळ वाटपाचा तसंच महिलावर्गात सौभाग्यदानासह मातीच्या सुगड्यांमधून विविध वस्तूंचं वाण देण्याचा प्रघात आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठा विविध पूजा साहित्यासह ऊस, बोरं, हरभरा आणि इतर साहित्यानं फुलून गेल्या आहेत. दक्षिण भारतात पोंगल आणि ईशान्य आणि पूर्वेकडच्या राज्यांमधे माघ बिहू म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

****

दरम्यान, मकर संक्रांतीच्या पुण्य पर्व काळात प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात आज अमृत स्नान होत आहे. आज पहाटेपासून विविध साधू आखाड्याच्या संत महंतांनी शाही स्नान करुन या पर्वणीला सुरुवात केली. एकंदर १३ आखड्यांचे प्रमुख संत–महंत आणि त्यांच्या परिवारातल्या साधुंनी त्रिवेणी संगमावर हे स्नान केलं. सर्वप्रथम

स्नान करण्याचा मान महानिर्वाणी पंचायतनी आखाड्याला मिळाला, तर शेटवचं शाही स्नान पंचायतनी निर्मल आखाड्याने केलं.

****

राष्ट्रीय चाचणी संस्था – एनटीएनं उद्या १५ जानेवारीला नियोजित युजीसी नेट परिक्षा पुढे ढकलली आहे. पोंगल, मकरसंक्रांत आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर ही परिक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करण्यात येत होती, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं एनटीएनं निवेदनाद्वारे कळवलं आहे.

****

केंद्र सरकारनं आतापर्यंत १३ लाख ६८ हजार क्विंटल सोयाबीनची किमान आधारभूत दरानं खरेदी केली आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी काल नवी दिल्लीत ही माहिती दिली. महाराष्ट्रात ३१ जानेवारी आणि राजस्थानमध्ये ४ फेब्रुवारीपर्यंत ही खरेदी सुरू राहणार आहे. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात किटकनाशक मिळतील, याची खबरदारी घेण्याचं आवाहन त्यांनी राज्यांना केलं आहे.

****

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात पाच पूर्णांक २२ शतांश टक्क्यांवर पोहोचला. गेल्या चार महिन्यातला हा नीचांक असल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने म्हटलं आहे. नोव्हेंबरमधे हा दर ५ पूर्णाक ४८ शतांश टक्क्यांवर होता. अन्नपदार्थांच्या किमतीत घसरण झाल्यामुळे महागाई कमी झाल्याचं यासंदर्भाल्या पत्रकात म्हटलं आहे.

****

यंदाच्या हज यात्रेकरता भारतातून पावणे दोनलाख जणांना जाता येईल. केंद्रीय अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. हज यात्रेसाठी भारतीयांचा कोटा एक लाख ७५ हजार २५ असा निश्चित करणाऱ्या करारावर रिजिजू आणि सौदी अरेबियाचे हज आणि उमरा विभागाचे मंत्री, एच ई तौफीक़ बिन फौझान अल– राबिया यांच्या उपस्थितीत काल स्वाक्षऱ्या झाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कराराचं स्वागत केलं आहे. हज यात्रा सुखकर व्हावी याकरता शक्य त्या सर्व सेवा सुविधा द्यायला सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

****

आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणी निर्देशांकात गडचिरोली जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती आरोग्य सेवा संचालनालयानं दिली आहे. गडचिरोली जिल्ह्यानं गरोदर माता नोंदणी, माता – बाल संगोपन, मुलांचं लसीकरण, हिवताप आणि क्षयरोग निर्मूलन अशा वेवेगवेगळ्या ६४ आरोग्य निर्देशांकांत केलेल्या कामगिरीवरून आरोग्य सेवा आयुक्त कार्यालयानं हे गुणांकन केलं आहे.

****

नाशिक शहरातल्या उड्डाणपुलावर रविवारी रात्री झालेल्या अपघातात जखमी आणखी दोन जणांचा काल मृत्यू झाला. त्यामुळे या अपघातातल्या मृतांची संख्या सात झाली आहे. आयशर टेम्पोने आपल्या पुढे सळई घेऊन जाणाऱ्या मालट्रकला धडक दिल्याने हा अपघात झाला होता. याप्रकरणी आयशर चालक, त्याचा मालक आणि स्टील पुरवठादार कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

केंद्र सरकारने कांद्यावरील लागू केलेलं २० टक्के निर्यात शुल्क तत्काळ रद्द करावं, या मुद्द्यासह बाजारभाव कमी झाल्यामुळे काल लासलगावला कांदा उत्पादकांनी काही काळ लिलाव बंद पाडले होते. बाजार समितीच्या आवारात राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक भारत दिघोळे यांनी आंदोलनाचं नेतृत्व केलं.

****

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात स्थापन विशेष तपास पथकात बदल करण्यात आला आहे. जुनं पथक बरखास्त करुन आता या पथकात बीड चे पोलिस उपअधिक्षक अनिल गुजर, छत्रपती संभाजीनगर इथल्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या अपर पोलिस अधिक्षक किरण पाटील यांच्यासह पुणे इथल्या अधिकार्यांचा समावेश आहे.

****